वर्ष पंधरावे : अंक ०६ : जून २०२६




## सह्याद्रीपासून हिमालयापर्यंत : आवाजापलीकडचं स्वप्न



# कॉक्लिआ वार्ता

मुकं करोति वाचालं...

COCHLEA - PUNE
कॉक्लिआ पुणे
श्रवण आणि वाचा विकासासाठी
FOR HEARING & SPEECH

• 1998 •

# COCHLEA WARTA



## नवीन वर्षाची पूर्वतयारी

Volume Fifteen : Issue 06 : JUNE 2026 Total Pages : 16 Rs. 10/-




# नवीन नोडल केंद्रांचा शुभारंभ









**COCHLEA WARTA** **कॉक्लिआ वार्ता**

**वर्ष : १५ वे | अंक : ०६**

# अंतरंग

**संपादक**
डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**
सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**
मृदुल हेमंत बापट
तृप्ती कोहिनकर
नेहा नाटेकर
Mr. Ebenezer Harding

**मुद्रण :**
व्यंकटेश प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट :**
श्री. संजीव शिंदे

**Editorial** ... ०२
- Mrs. Manasee Date

**सह्याद्रीपासून हिमालयापर्यंत : आवाजापलीकडचं स्वप्न** ... ०३
– ऋषिकेश पाटील

**स्वरनाद केंद्रामधील माझा अनुभव** ... ०९
– प्रथमेश सावंत

**Fly like a Phoenix : Fearless & Invincible** ... ११
- Om Prakash Babar

**Delivering Grassroot Services** ... १२
- Pallavi Sharma

**जनजागृती उपक्रम : आव्हाने आणि अनुभव** ... १४
– अनुपमा ढमाळ

| | | |
|---|---|---|
| **Printed & Published by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Owned by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Printed by** | : | Sanjeev V. Shinde<br>Paud Road, Kothrud, Pune. |
| **Published at** | : | Cochlea Pune for Hearing and Speech<br>161-A, Modibaug, Shivsagar Society,<br>Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411 016. |
| **Editor** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |

# EDITORIAL

**- Mrs. Manasee Date**

It's so nice when such news come to us. Two more children who passed out from Swaranaad are now B.Tech and one of them is Om Babar, who has given a write up in this issue.

One more exciting news is setting up nodal centres at Ahiilyanagar, Manchar, Daund and Goa. Pallavi Sharma madam has given a detailed write up about the same in this issue.

Awareness camps were held in 6 different areas around Pune. A team from Cochlea was sent to all these places. Anganwadi teachers and Asha workers were given information regarding early detection and intervention for hearing impaired children. They were also told about how to detect, and once detected how to collect the details from their parents and how to guide them to Cochlea. They were also told briefed about all the facilities available in Cochlea. Hopefully it should percolate to the rural areas.


Prathamesh Sawant has given a very nice write up about his journey from childhood to his job acquired recently. He has expressed his gratitude towards Cochlea by donating his first pay to Cochlea. He says, "It will always be my pleasure to help hearing impaired children like me".

We are proud to give a list of our students who have made a significant progress in 10th and 12th exams.

Our first and foremost student Hrishikesh Patil has climbed up and reached Everest Base Camp last month. He has given a very inspiring writeup how he overcame his fears and reached EBC.

Now all the teachers are busy preparing for the coming academic year and are eagerly waiting for their students who are also eager to meet their teachers and tell them all the fun they had in the holidays. It is always a pleasure to see the bond between the teachers and students of Swaranaad.

◆◆◆




# सह्याद्रीपासून हिमालयापर्यंत : आवाजापलीकडचं स्वप्न

**ऋषिकेश पाटील**
स्वरनाद केंद्राचा पहिला विद्यार्थी

लहानपणी मला जगाचा आवाज ऐकू येत नव्हता. काही वेळा लोकांमध्ये असूनही मनातून एकटं वाटायचं. सगळे पटकन बोलून जायचे आणि मी ते समजून घेण्याचा प्रयत्न करत राहायचो. जन्मतः कर्णबधीर असल्यामुळे छोट्या छोट्या गोष्टींसाठीसुद्धा जास्त धैर्य, संयम आणि जिद्द लागायची. पण माझ्या आयुष्यात एक मोठा टर्निंग पॉईंट आला – कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग ॲण्ड स्पिच संस्थेने मला फक्त बोलायला शिकवलं नाही, तर जगासमोर उभं राहायला शिकवलं. वाचा–भाषा प्रशिक्षणामुळे मी शब्द शिकत गेलो, आवाज समजत गेला आणि हळूहळू आत्मविश्वास वाढत गेला. माझ्या आई–वडिलांनी घेतलेली मेहनत, त्यांचा संयम, त्यांचा त्याग आणि माझ्यावर ठेवलेला विश्वास यामुळेच आज मी इथपर्यंत पोहोचलो आहे.

२००६ मध्ये बाबांमुळे मला Tata Motors Pune Venturers Trekking Group ची ओळख झाली. सुरुवातीला ट्रेक म्हणजे फक्त डोंगर चढणे आणि इतकंच वाटायचं. पण हळू हळू लक्षात आलं की ट्रेकिंग मला आतून मजबूत करत आहे. प्रत्येक किल्ला, प्रत्येक ट्रेक मला स्वतःची ओळख करून देत होता. सह्याद्रीच्या वाटांवर चालताना नकळत हिमालयाचं स्वप्न मनात रुजत गेलं. छोट्या छोट्या ट्रेक पासून सुरू झालेला प्रवास आता मोठ्या पर्वतांची वाट पाहू लागला होता.

२०१४ मध्ये Pune Veturers ट्रेक ग्रुपकडून Treker of the Year पुरस्कार मिळाला. २०१५ मध्ये मी Jawahar Institute of Mountaineering and Winter Sports येथे basic Mountaineering Course पूर्ण केला. त्या कोर्समध्ये top 10 participants मधून मला Best Consolation Prize मिळालं. तो क्षण माझ्यासाठी

खूप खास होता. कारण पहिल्यांदाच मला वाटलं, 'हो... आपणही हे करू शकतो.' त्यानंतर मी हिमालयात Mt. Kuari Pass Trek पूर्ण केला. हिमालयातला तो अनुभव पूर्णपणे वेगळा होता. बर्फाच्छादित पर्वत, शांतता आणि त्या वातावरणात चालताना मनात एकच विचार यायचा, 'सह्याद्रीपासून सुरू झालेला हा प्रवास आता हिमालयात आणखी पुढे न्यायचा आहे.' हिमालायाकडे मी नेहमीच वेगळ्याच नजरेने पाहायचो. मनात एक स्वप्न हळूहळू मोठं होत होतं.. एक दिवस एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंत पोहोचायचं.

**EBC चा निर्णय** –

आता हिमालयात जायचं.... पण कोणासोबत? हा सगळ्यात मोठा प्रश्न होता.

जानेवारी महिन्यात मी Giripremi सोबत जाण्याचा निर्णय घेतला आणि फॉर्म भरला. सुरुवातीला एप्रिलच्या पहिल्या बॅच सोबत जाण्याचा विचार होता. पण मनात एकच गोष्ट सतत चालू होती, आपली अजून पुरेशी तयारी झालेली नाही. मग ठरवलं, अजून तीन महिने तयारी करू. Walking, Trekking आणि Fitness वर focus करू आणि मग पुढच्या बॅच सोबत जाऊ. खरं सांगायचं तर, आता जोरदार तयारी करायची! असा पूर्ण प्लॅन होता. सुरुवातीचे दोन महिने खरंच चांगली तयारी सुरू होती. रोज मनात एकच मोटिव्हेशन होतं, 'एव्हरेस्ट बेस कॅम्प करायचाच.' पण दिवस पुढे जात गेले... आणि तयारी मात्र प्लॅन एव्हढी झालीच नाही. ट्रेक जवळ येत होता आणि मनात थोडी भीतीही वाढत होती. इतक्या कमी तयारीत खरंच ट्रेक पूर्ण होईल का? हिमालयात शरीर साथ देईल ना? Altitude manage होईल का? पण सगळ्यात मोठा प्रश्न मात्र hearing machine चा होता. इतक्या थंडीत मशीन चालेल का? Battery संपली तर? Communication कसं होईल? काही emergency आली तर? या प्रश्नांची उत्तरं internet वरही फारशी मिळत नव्हती. कारण माझ्यासारखा hearing machine वापरून Everest base Camp करणारा कोणी अनुभव समोर नव्हता. म्हणून प्रत्येक प्रश्नासोबत थोडी भीती आणि थोडी uncertainty होती. खरं सांगायचं तर काही रात्री मी फक्त हाच विचार करत बसायचो – आपण खरंच हे करू शकू ना?

आणखी एक गोष्ट सतत मनात होती, माझ्यासोबत कोणी ओळखीचे नव्हते. हा पूर्ण ट्रेक जणू सोलो ट्रेक सारखा वाटत होता. ग्रुपमध्ये सगळे नवीन लोक होते. आपल्याला समजून घेतील का? मी पटकन समजू शकलो नाही तर? पुन्हा पुन्हा विचारलं तर त्यांना त्रास होईल का? असे अनेक छोटे छोटे विचार मनात यायचे. काही वेळा वाटायचं, इतक्या प्रश्नांपेक्षा न गेलेलं बरं नाही का? पण दुसऱ्याच क्षणी मनातून एक आवाज यायचा – जर भीतीमुळे थांबलो, तर हिमालय फक्त स्वप्नातच राहिल. आणि मग ठरवलं...भीती आहे, पण यावेळी स्वप्न जास्त मोठं आहे.

हिमालयातला प्रत्येक दिवस मला काहीतरी नवीन शिकवत होता. उंची वाढत होती, ऑक्सिजन कमी होत होता, थंडी वाढत होती आणि प्रत्येक दिवसासोबत शरीराची खरी परीक्षा सुरू होती. High altitude मुळे श्वास घेणं आणि चालणं कठीण

होत होतं. सलग चार दिवस मला डोकेदुखीचा त्रास होत होता. शरीर थकत होतं, काही वेळा चालताना पावलं जड वाटायची. पण मन मात्र हार मानायला तयार नव्हतं. एक स्वप्न खास मनात होते – kala Patthar वरून सूर्योदयात दिसणारा Mount Everest पाहायचा. त्या क्षणासाठी मी खूप उत्सुक होतो. पण दुर्दैवाने तो क्षण मला अनुभवता आला नाही. त्या वेळी मन थोडं खट्टू झालं. इतक्या जवळ येऊनही ते स्वप्न अपूर्ण राहिल्यासारखं वाटलं. पण हिमालय शिकवतो – प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी होत नाही. काही क्षण फक्त मनात जपून ठेवायचे असतात. या संपूर्ण प्रवासात ट्रेकिंग सोबत फोटोग्राफी आणि शॉर्ट फिल्म चे काम सांभाळणं हेही खूप मोठं चॅलेंज होतं. एका बाजूला शरीर साथ देत नव्हतं. Altitude मुळे त्रास होत होता आणि दुसऱ्या बाजूला प्रत्येक क्षण कॅमेरामध्ये जपून ठेवायचा होता. Health, Trekking आणि Creativity या तिनही गोष्टी एकत्र सांभाळताना अनेक वेळा स्वतःलाच शांत ठेवावं लागलं. काही planned shots राहू गेले, काही क्षण फक्त डोळ्यांनीच अनुभवावे लागले. सुरुवातीला त्याचं वाईट वाटलं, पण नंतर जाणवलं, प्रत्येक गोष्ट कॅमेऱ्यामध्ये कॅप्चर होत नाही. काही क्षण फक्त मनात जपले जातात.

कम्युनिकेशन हे सुद्धा एक मोठं चॅलेंज होतं. Language barrier, lip reading आणि नवीन वातावरणात conversation समजून घेणे mentally खूप tiring होतं. काही वेळा लोक बोललेलं १०० पैकी फक्त २५ टक्केच समजायचं. मग पुन्हा विचारावं लागायचं. त्यांना पुन्हा सांगायला लागायचं. काही वेळा स्वतःलाच लाजल्यासारखं व्हायचं. पण त्या टिमने मला कधीच वेगळं वाटू दिलं नाही. प्रत्येक गोष्ट शांतपणे परत परत सांगितली, समजून घेतलं, वेळ दिला, सपोर्ट दिला. Guides, teammates आणि मित्रांनी कधीच 'लवकर चल', असे pressure दिले नाही. उलट मला फोटो काढायला, व्हिडिओ शूट करायला वेळ दिला. त्यामुळे हा प्रवास फक्त ट्रेक राहिला नाही, तर माझा स्वतःचा अनुभव बनला.

दररोज ट्रेक संपल्यानंतर संध्याकाळी आम्ही सगळे दिवसाचे अनुभव शेअर करायचो. मीसुद्धा माझे अनुभव मराठीत सांगायचो. पण ग्रुपमध्ये काही जण महाराष्ट्राबाहेरचे होते, त्यांना मराठी समजत नव्हते. मग आमचे लिडर माझं मराठीतलं बोलणं इंग्लिशमध्ये भाषांतर/ट्रान्सलेट करून त्यांना सांगायचे. सगळं छान चाललं होते, पण मनात एक गोष्ट सतत खटकत होती, आपल्याला किमान हिंदी तरी व्यवस्थित बोलता यायला हवं होतं. मला हिंदी समजायचं, पण बोलताना अजूनही थोडा संकोच वाटायचा. त्यामुळे काही वेळा वाटायचं की माझे अनुभव सगळ्यांपर्यंत व्यवस्थित पोहोचत नाहीयेत. ट्रेकचे शेवटचे काही दिवस बाकी होते आणि अचानक एक भन्नाट कल्पना सुचली. मी मोबाईलमध्ये माझं बोलणं मराठीत टाईप करायला सुरुवात केली. नंतर ट्रान्सलेशन ॲप वापरून ते इंग्लिशमध्ये ट्रान्सलेट करायचो आणि मग सगळ्यांना वाचून दाखवायचो. पहिल्यांदा जेव्हा मी असं केलं, तेव्हा सगळेजण हसायला लागले आणि मलाही हसू आलं. कारण ती खरंच भन्नाट कल्पना होती. पण त्याहून आनंदाची

गोष्ट म्हणजे आता सगळ्यांना माझे अनुभव व्यवस्थित समजू लागले होते. त्या छोट्याशा युक्तीमुळे भाषा हा अडथळा राहिला नाही. त्या दिवशी मला पुन्हा एकदा जाणवलं, मर्यादा असतात, पण त्यापेक्षा मोठी गोष्ट म्हणजे त्यावर उपाय शोधण्याची तयारी. ही माझी पहिली इंटरनॅशनल ट्रिप होती आणि पहिल्यांदाच हिमालयात पाऊल ठेवत होतो. त्यामुळे हा प्रवास अजूनच स्पेशल झाला.

Suspension Bridges, बर्फाच्छादित पर्वत, शांत वातावरण आणि एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंत पोहोचण्याचा क्षण – हे सगळं आयुष्यभर लक्षात राहणार आहे. पण या सगळ्या सुंदर अनुभवांसोबत मनात एक वेगळीच भीती सतत होती. जर hearing machine बंद पडली तर? नदीचा आवाज, 'Yak'च्या घंट्या, पर्वतांमधील शांतता... किंवा जय भवानी जय शिवाजी.... चा आवाजही मला ऐकू आला नाही तर? हे विचार काही वेळा मनात खोलवर जायचे. कारण हिमालयात फक्त दृश्य नाही, तर तिथली शांततासुद्धा अनुभवायची असते.

सगळ्यात आनंदाची गोष्ट म्हणजे माझ्या BTE hearing machine ला संपूर्ण ट्रेकमध्ये कोणतीही मोठी अडचण आली नाही. पण हिमालयात गेल्यावर एक गोष्ट मात्र लगेच लक्षात आली, नेहमीच्या वातावरणात hearing machine ची battery साधारण १६ दिवस चालायची, पण तिथल्या कडाक्याच्या थंडीमुळे जवळपास निम्मीच चालत होती. १६ दिवस चालणारी बॅटरी फक्त ८ दिवसात संपत होती. सुरुवातीचे दोन दिवस मी रात्री झोपताना hearing machine काढून त्याच्या बॉक्समध्ये ठेवून सॅकमध्ये ठेवत होतो. पण सकाळी उठल्यावर मशीन अक्षरशः बर्फासारखं थंड झालेलं असायचं. तेव्हा काय करावं हेच समजत नव्हतं. एक दिवस अचानक एक कल्पना सुचली. आपण झोपताना मोबाईल पांघरुणात ठेवतो, त्यामुळे बॉडी हिटमुळे त्याचं टेंप्रेचर बरंच नॉर्मल राहतं. मोबाईल थंड पडत नव्हता, मग हिअरिंग मशीनसाठी हेच करून बघूया असं वाटलं. त्या रात्री मी हिअरिंग मशीनचा बॉक्स पांघरुणात, माझ्या जवळ ठेवून झोपलो. दुसऱ्या दिवशी सकाळी मशीन काढून पाहिलं आणि मला आश्चर्य वाटलं, मशीन अजिबात थंड झालं नव्हतं.

बस्स.... मग उरलेल्या संपूर्ण ट्रेकमध्ये मी हाच उपाय वापरत राहिलो. छोटासा उपाय होता, पण त्याने एक मोठी चिंता दूर झाली. त्याक्षणी मला जाणवलं. पर्वतांमध्ये अनेक समस्यांची उत्तरं पुस्तकांमध्ये नाही, तर अनुभवांमध्ये सापडतात.

या प्रवासात आणखी एक खास क्षण अनुभवायला मिळाला. Giripremi चे प्रमुख उमेश झिरपे यांना भेटण्याची माझी अनेक वर्षांपासून इच्छा होती. त्यांच्या गिर्यारोहणाच्या प्रवासाबद्दल आणि कामाबद्दल मी खूप ऐकलं होते, पण त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी कधीच मिळाली नव्हती. पण हिमालयाने तीही इच्छा पूर्ण केली. namche bazaar मधील Khumbu Resort येथे त्यांची अचानक भेट झाली आणि तो क्षण माझ्यासाठी खूप खास होता. त्यानंतर Everest Base Camp मध्ये पुन्हा एकदा

त्यांना भेटण्याची संधी मिळाली. त्या भेटीमुळे एक नवीन स्वप्न मनात रुजलं.

या प्रवासात आणखी एक गोष्ट मनाला खूप स्पर्श करून गेली, ती म्हणजे पोर्टर्सची मेहनत. दररोज त्यांच्या पाठीवरचं अवजड सामान पाहिलं की मनातून खूप आदर वाटायचा. आपण स्वतःची बॅग घेऊन चालतानाही दमून जायचो, आणि ते मात्र अनेक किलो वजन घेऊन सहजपणे चढ–उतार करत पुढे जात होते. काही वेळा त्यांच्याकडे पाहून खरंच वाईट वाटायचं आणि मनात एकच विचार यायचा, आपण ज्या प्रवासाचा आनंद घेतोय, त्यामागे या माणसांची किती मोठी मेहनत आहे. त्यांच्या कष्टाबद्दल काय बोलावं हेच समजत नव्हतं. शब्दच अपुरे पडतात. त्या क्षणी मला जाणवलं की हिमालय फक्त पर्वतांबद्दल नाही, तर तिथे जगणाऱ्या आणि इतरांची स्वप्नं पूर्ण होण्यासाठी दिवस–रात्र मेहनत करणाऱ्या माणसांबद्दलही आहे. मग तो क्षण आला... ज्या क्षणासाठी मी इतके दिवस स्वप्न पाहिलं होतं. ज्या क्षणासाठी मनात भीती होती, तयारी होती, संघर्ष होता आणि जिद्द होती. 'एव्हरेस्ट बेस कॅम्प..' जेव्हा मी एव्हरेस्ट बेस कॅम्पला पोहोचलो, तेव्हा काही क्षण मला खरंच विश्वास बसत नव्हता. समोर तो मोठा दगड.... EVEREST BASE CAMP लिहिलेला बोर्ड... आणि आजूबाजूला भव्य हिमालय.

Giripremi टीमने EBC पूर्ण झाल्यावर मस्त अमृततुल्य चहा देऊन स्वागत केलं. त्या कडाक्याच्या थंडीतला तो गरम चहा आजही आठवला की मन उबदार होतं. कधी कधी मोठ्या दगडावर थांबून फोटो काढताना मनात हजारो विचार चालू होते,

खरंच आपण इथपर्यंत पोहोचलो? इतका कठीण प्रवास... इतकी मेहनत... आणि आज आपण Everest Base Camp वर उभे आहोत... त्या क्षणी काही सेकंद मी फक्त शांत उभा राहिलो. आजूबाजूला लोक आनंदात होते, फोटो काढत होते, हसत होते, पण माझ्या मनात मात्र पूर्ण आयुष्याचा प्रवास चालू होता. लहानपण... थेरपीचे दिवस... Communication मधले struggles, स्वतःवरचा doubt.. आणि आज.... हिमालयात Everest Base Camp. डोळ्यात नकळत पाणी आले, मनातून फक्त एकच गोष्ट बाहेर आली, 'Thank you Aai-Baba...' तुमच्या मेहनतीमुळे, कष्टामुळे, त्यागामुळे आणि विश्वासामुळेच मी इथपर्यंत पोहोचलो. खरंच... तुमच्याबद्दल बोलायला शब्दच नाहीत. त्या क्षणी मला जाणवलं, हे फक्त माझं स्वप्न नव्हतं. हे माझ्या आई–बाबांचं आयुष्यभराचं स्वप्न होतं. त्या क्षणी मला कोणताही आवाज ऐकू येत नव्हता, पण मन मात्र खूप काही बोलत होतं. 'तू करू शकतोस...', 'तू इथपर्यंत पोहोचलास...', 'तू हार मानली नाहीस...' माझी आई नेहमी मला एक गोष्ट सांगायची, Main hoon na... tum definitely complete kar sakte ho... आणि EBC पूर्ण झाल्यावर आईने हसत एक वाक्य सांगितलं, Ab Mount Everest ke top tak bhi pahunchna... त्या क्षणी जाणवलं, हा फक्त एक ट्रेक नव्हता. हा विश्वासाचा प्रवास होता.

Summit करून Gorakshep ला परत आल्यानंतर थोडा वेळ मी डायनिंग हॉल बाहेर एकटाच शांत बसलो होतो. जवळ Giripremi ने उभारलेला छत्रपती शिवाजी

महाराजांचा पुतळा होता. थंड हवा... समोर हिमालय... आणि पूर्ण शंतता... मी फक्त त्या पुतळ्याकडे बघत बसलो होतो. मनात अचानक एक विचार आला, किती धाडस आहे रे तुझ्यात... त्या क्षणी मी स्वतःशीच बोलत होतो. इतक्या भीती... इतके डाऊटस्... इतकी चॅलेंजेस... आणि तरीही आपण इथपर्यंत आलो होते. थोडावेळ छत्रपती शिवाजी महाराजांकडे पाहतच बसलो. मनातून फक्त एकच भावना येत होती, Thank you... for everything.

त्या शांततेत एक वेगळंच बळ मिळाल्यासारखं वाटत होतं. नंतर मोबाईल हातात घेतला. होम स्क्रीनवर बाबांचा फोटो दिसला, आणि पुन्हा डोळे भरून आले. जणू मी त्यांच्याशीच बोलत होतो. बाबा... तुमच्यामुळे हे सगळं शक्य झालं. तुम्ही मला इथपर्यंत पोहोचवलं... तुम्ही मला स्वप्न पाहायला शिकवलं... तुम्ही मला कधी हार मानू दिली नाही... आता मी हा प्रवास थांबवणार नाही.. आता अजून पुढे चालत राहणार... त्या दिवशी मला एक गोष्ट खूप स्पष्टपणे समजली. जन्मतः कर्णबधीर असलेला मुलगा हिमालयापर्यंत पोहोचला होता. पण हे फक्त त्याचं यश नव्हतं. हे त्याच्या आई–वडिलांचं यश होतं. त्याच्या शिक्षकांचं यश होतं, त्याच्या थेरपिस्टचं यश होते, त्याच्या मित्रांचं यश होते, त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्यकाचं यश होतं, एव्हरेस्ट बेस कॅम्पने मला खूप काही शिकवलं. patience शिकवले, strength शिकवली, acceptance शिकवला. स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवलं, हेल्थ किती महत्त्वाची आहे हे शिकवलं, सपोर्ट किती महत्त्वाचा असतो हे शिकवलं आणि काही वेळा कोणीतरी आपल्यागतीने चालतंय म्हणून थांबून घेणं किती मोठी गोष्ट असते हेही शिकवलं.

सह्याद्रीपासून सुरू झालेला प्रवास हिमालयापर्यंत पोहोचला... पण अजून थांबलेला नाही. Everest Base Camp पूर्ण झालं, पण आता नवीन स्वप्न बघायचे उमेद आहे. कारण काही स्वप्नांना आवाज नसतो, पण त्यांच्यात जिद्द खूप मोठी असते. आज मी जे काही साध्य करू शकलो, ते एकट्याने कधीच शकय झालं नसतं.

माझे आई–बाबा, संपूर्ण परिवार, कॉक्लिआ आणि स्वरनाद टीम, Pune Venturers Trek Club, BMC Sept'2015 batch, Giripremi EBC Batch आणि Team, Millennium Company Team. माझे फोटोग्राफर, मित्र–मैत्रिणी आणि या प्रवासात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे साथ देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमुळेच हे स्वप्न पूर्ण होऊ शकलं. माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या, मला प्रोत्साहन देणाऱ्या आणि प्रत्येक टप्प्यावर साथ देणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार.. पुन्हा एकदा खूप खूप धन्यवाद..!

EVEREST BASE CAMP हा फक्त माझा प्रवास नव्हता.... तो आपल्या सगळ्यांचा प्रवास होता आणि जेव्हा जिद्द, विश्वास, कुटुंबाचे प्रेम आणि हिमालयाची हाक एकत्र येते... तेव्हा अशक्य वाटणारी स्वप्नंसुद्धा पूर्ण होतात...

सह्याद्रीपासून हिमालयापर्यंतचा हा प्रवास फक्त माझा नव्हता....

तो माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाचा प्रवास होता..

◆◆◆

# स्वरनाद केंद्रामधील माझा अनुभव

**प्रथमेश सावंत**
स्वरनाद, विद्यार्थी



नमस्कार,

मी प्रथमेश जितेंद्र सावंत, माझा जन्म १२ ऑक्टोबर, २००२ चा आहे. मी जन्मतः कर्णबधिर आहे. हे माझ्या आई-वडीलांना मी अडीच वर्षांचा झाल्यानंतर कळाले. तेव्हा मांकडे हिअरिंग सर्व्हीसेसमध्ये माझी पहिली बेरा टेस्ट केली गेली. त्या टेस्टमध्ये मला प्रोफॉन्ड लॉस म्हणजे १०० टक्के पेक्षा जास्त हिअरिंग लॉस आहे हे समजले. तेव्हा माझ्या आई-वडीलांच्या पायाखालची जमिनच सरकली, पण ते वेळीच सावरले.

सर्वप्रथम मला ऐकू येण्यासाठी पॉकेट मॉडेल हिअरिंग मशीन घेतले व त्यांनीच स्पीच थेरपी द्यावी लागेल असे सुचवले. सदाशीव पेठेत स्पीच थेरपीसाठी काळेवाडी पिंपरी वरून जाणे-येणे व फी तशी परवडणारी नव्हती. म्हणून आठवड्यातून दोन दिवस मला स्पीच थेरपी देण्यात आली.

परंतू पॉकेट मॉडेल मशीन व दोन दिवसाची थेरपीने माझ्या ऐकण्यामध्ये म्हणावा असा फरक पडला नाही. तेव्हा अचानक एक दिवस माझ्या वडीलांना चिंचवड येथील मोरया मल्टीस्पेशालीस्ट हॉस्पिटलच्या बाहेर कर्णबधिर प्रशिक्षण व स्पीच थेरपी असा बोर्ड दिसला. तेथे चौकशी केल्यावर त्यांना सौ. रक्षा देशपांडे मॅडम स्वतः कर्णबधिर मुलांना प्रशिक्षण देतात व स्पीच थेरपी घेतात हे कळाले. मग खऱ्या अर्थाने माझी स्पीच थेरपी व वाचा भाषा प्रशिक्षण चालू झाले.

रक्षा मॅडम व डॉ. वाचासुंदर यांना लक्षात आले की माझा हिअरिंग लॉस खूप जास्त आहे आणि पॉकेट हिअरिंग मशीन काही काम करत नाही. म्हूणन त्यांनी डोनेशनमधून मला बी.टी.ई. हिअरिंग मशील उपलब्ध करून दिले. जी माझ्या आई-वडिलांना परवडणानी नव्हती. ही मोलाची मदत मला रक्षा मॅडम आणि डॉ. वाचासुंदर सरांनी करून दिली. त्याचा मला खूप उपयोग झाला. माझी भाषा सुधारली व मला नॉर्मल स्कूलमध्ये प्रवेश मिळाला.

माझे शालेय शिक्षण खूप चांगल्या पद्धतीने चालू होते. तेव्हा डॉ. वाचासुंदर सरांनी व रक्षा मॅडम यांनी पुन्हा एकदा माझ्या आई-वडिलांना

बोलावून माझ्या प्रगतीचा आढावा घेतला. माझी अभ्यासातली प्रगती म्हणजे मला मिळालेला 'आदर्श विद्यार्थी पुरस्कार' की जो नॉर्मल मुलांच्या वर्गात एका कर्णबधिर मुलाला मिळालेला. पहिला-वहिला पुरस्कार होता तो.. तेव्हा या पुरस्काराने डॉ. वाचासुंदर सर व रक्षा मॅडम यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

मग त्यांनी माझ्या आई-वडिलांना माझ्या कानाच्या ऑपरेशन विषयी माहिती दिली व माझ्या पालकांना आश्वसथ केले की, कॉक्लिया पुणेच्या पुढाकाराने, लोक वर्गणीतून, पालकांचे काही अंशदान यातून माझे कॉक्लिअर ईम्प्लांट झाले. ऑपरेशन मी नऊ वर्षांचा असताना म्हणजेच २१ जानेवारी २०११ रोजी करण्यात आले.

कॉक्लिअर ईम्प्लांट म्हणजे माझा पुर्णजन्मच होता जणू.. कारण ऑपरेशनमुळे मला अगदी लहानातील लहान ही आवाज ऐकू यायला लागले होते. त्यांचा उपयोग मला भाषा-वाचा सुधारण्यासाठी खूप मोलाचे ठरले आणि माझे पुर्ण शालेय शिक्षण खूप चांगल्या पद्धतीने पुर्ण करू शकलो.

मी दहावी, बारावी, बी.एससी. (कॉम्प्यूटर सायन्स्) आणि एम.एससी. (कॉम्प्यूटर सायन्स्) पूर्ण केले. हे सर्व शक्य झाले. कॉक्लिआ पुणे संस्था - डॉ. वाचासुंदरसर, सौ. रक्षा मॅडम, स्वरनाद शाळा, शिक्षक व इतर सहकारी यांच्या मुळेच मी आज एक चांगला माणूस जिवन जगत आहे.

या सर्वांचा मी आयुष्यभर कृतज्ञ राहिल. सर्वांच्या आर्शिवादाने मला चांगली नोकरी मिळाली आहे. या सर्वांची मी परतफेड करू शकत नाही. पण फुल ना फुलाची पाकळी म्हणून मी माझा पहिला पगार कॉक्लिआ संस्थेला समर्पीत केला. यातून माझ्यासारख्या कर्णबधिर मुलांना काही मदत झाली तर ते मला समाधान देणारे ठरेल आणि इथून पुढेही माण्याकडून संस्थेसाठी नेहमी मदत सुरूच राहिल.

धन्यवाद...!

◆◆◆

## Fly like a Phoenix : Fearless & Invincible

**Om Prakash Babar**
Ex-Student of Swaranaad, Kothrud Center

Hi Everyone,

My name is Om Prakash Babar. By birth I am hearing impaired. Initially, it was very difficult for my parents to accept this. Eventually, they accepted this challenge and started focusing on how to support my development. It was a very hard struggle for them.

I started wearing a hearing aid at the age of 3. I received speech therapy and preschool at Swaranaad, Cochlea Pune for Hearing and Speech. Where I received a firm foundation and environment which helped my transition smoothly to normal school.

I have appeared for scholarship exams and attempted competitive exams in 5th and 10th std. I was honoured with 'Best Student Award'. I secured 94% in 10th Class and 80% in 12th Class. Thereafter, I successfully cracked JEE Main Exam and MHT-CET Exam. Then I was admitted to the B.Tech. programme in Computer Science and Engineering at PCCOE, Akurdi, Pune.

Currently, I successfully completed and graduated from B.Tech. CSE Program at PCCOE, Pune with 65%. Currently I am working as a Developer Inter at Persistant System. I am highly eager to begin my professional career in this field.

For that I believe that our society should give support and encouragement to students like me who have the ambition to grow and build a bright future. I would like to share a message with other hearing impaired students and their parents, 'it is important to work hard every day, build confidence in yourself and make it a habit to Read-Listen-Speak regularly. This will help to improve your language, Speech and Personal Development.

So, overall, the major support, contribution and guidance were from Swaranaad School, teachers, Mrs. Raksha madam, Dr.Wachasundar sir and most importantly my parents, played a vital role in shaping my journey. Finally, I would like to express my sincere gratitude once again - Thank you very much.

Also, thank you for giving me this opportunity to share my feelings through this article.

◆◆◆

# Delivering Grassroot Services through Nodal Centers in the Rural for our Hearing-impaired Children

**Pallavi Sharma**
P.R.O.

An impact contribution going forward ake the essential and necessary change in our society is never easy, In fact it is tumultuous journey. We are very well aware of the fact that deafness is a growing concern today, not only globally but in our country as well. One needs to be cognizant of the significant incidence of deaf babies born in Maharashtra itself, is roughly about 6,000 per year. Out of all the impairments, working in the field of hearing-disability is rewarding ,if the deaf baby's condition is detected early intervened early either through the usage of hearing aid or a surgical intervention through a cochlear implant surgery. The most crucial part in a deaf child's life post intervention is the rehabilitation.

Rehabilitation through a specialized curriculum in a pre-school setup meant solely for the hearing-impaired children is the key to mainstreaming them into a regular school after having attained a good level of speech and language development.

So far, we have been running Speech and Language Development centers across Maharashtra and Goa. With time, we have realized that we need to go beyond this service and help these children to develop in a more holistic way catering to their over all development as well.

Our consistent hard work over an extended period, have turned out fruitful where in we feel we are ready and equipped to start our nodal centers at 4 different locations namely Ahilyanagar, Manchar, Daund and Goa , based on our model at Kothrud center, starting this June 2026. Having said that, it is going to be an ongoing process of screening , detection, intervention and then placing these children into our pre-school unit in the upcoming years. There will be regular and constant supervision on operations of these units ensuring smooth functioning of all systems, curriculum  and sustainability.

We had our Special Educators hailing from diverse locations attend a comprehensive 4 day Teacher Training Skills Enhancement Workshop at Uravade in the month of April 2026.

All these teachers are now roaring to go, giving their full dedication and commitment at these pre-school units. Each unit will comprise of 6-8 children, with 2 teachers fulfilling education criterion through our specialized curriculum fostering a holistic growth.

By simultaneously running such a well planned rehabilitation program in specialized pre-school units across different rural areas should be given a chance to prove to be an excellent platform that will surely mainstream these hearing impaired children. It will help them attain formal education, secure employment and create their own livelihood, enabling them to support themselves, be independent, and not be a burden to their family, government and society.

Every Organization dreams of growth and expansion. Having started out in the 90's, we have come a long way, have and still successfully continue our mission of empowering hearing-impaired children till date, through early detection, early intervention and rehabilitation .

The accomplishment and success of these specialized pre-school units will be measured by all of us putting our heads together and working hand in hand. We are truly blessed to have our every team member, CSR partners, Donors, Sponsors, and well-wishers be a part of this special journey unfolding from June 2026.

It is a proud moment for Cochlea Pune for Hearing and Speech for being able to set up regional pillars through our nodal centers at Ahilyanagar, Manchar, Daund and Goa. Chasing such a dream of growth and expansion is a promise to this evolution that honors our vision of **YES..! EVERY DEAF CHILD WILL SPEAK.**

◆◆◆

## जनजागृती उपक्रम : आव्हाने आणि अनुभव

**अनुपमा ढमाळ**
स्वरनाद, सामाजिक कार्यकर्ती

कोणत्याही सामाजिक किंवा आरोग्यविषयक विषयाची माहिती समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी जनजागृती अत्यंत महत्त्वाची असते. योग्य माहितीच्या अभावामुळे अनेक समस्या दुर्लक्षित राहतात आणि त्याचा परिणाम संबंधित व्यक्ती व त्यांच्या कुटुंबांवर होऊ शकतो. त्यामुळे समाजामध्ये जागरूकता निर्माण करणे हे परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल असते.

फेब्रुवारी ते मे २०२६ या कालावधीत शहरी व ग्रामीण भागातील जसे की घोडेगाव, मंचर, नारायणगाव, जुन्नर येथील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर्स यांच्यासाठी कर्णबधिर मुलांचे लवकर निदान, उपचार आणि पुनर्वसन या विषयावर जनजागृती सत्रांचे आयोजन करण्यात आले. सत्रांमध्ये कर्णबधिरतेची प्रारंभिक लक्षणे, लवकर निदानाचे महत्त्व, उपलब्ध उपचार, सुविधा आणि अशा मुलांच्या विकासामध्ये समुदायाची भूमिका, संस्थेच्या कार्याचा आढावा, विविध सेवांचीही माहिती देण्यात आली. समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे. प्रत्येक कर्णबधिर बालकाला विकासाच्या समान संधी मिळाव्यात, हा देखील संस्थेच्या कार्याचा मुख्य उद्देश, या विषयी सांगण्यात आले.

या उपक्रमादरम्यान ग्रामीण आणि शहरी भागात काम करण्याचा वेगळा अनुभव मिळाला. शहरी भागात विविध माध्यमांमुळे आरोग्यविषयक विषयांची काही प्रमाणात माहिती लोकांपर्यंत पोहोचलेली दिसून आली. मात्र ग्रामीण भागात अजूनही अनेक महत्त्वाच्या विषयांबाबत पुरेशी जागरूकता नसल्याचे जाणवले. सहभागींच्या प्रश्नांमधून आणि उत्सुकतेतून योग्य माहितीची किती मोठी गरज आहे, हे स्पष्टपणे दिसून आले. या मुलांसाठी पूर्वप्राथमिक शिक्षण किंवा शाळा चालवल्या जातात याबाबतची ही माहिती नसल्याचे आढळून आले.

सत्रादरम्यान कर्णबधिर मुलांची लक्षणे, त्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यांच्या कुटुंबीयांचा संघर्ष याविषयी चर्चा करताना सहभागींच्या भावनाही व्यक्त होताना दिसतात.

विशेषतः रोल प्ले उपक्रमादरम्यान सहभागींचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. अनेक सेविका स्वतः बालकांच्या भूमिकेत सहभागी झाल्या. त्यामुळे सत्र केवळ माहितीपर न राहता अनुभवात्मक बनते. सहभागी स्वतः त्या बालकांच्या भावविश्वाशी जोडले गेले आणि विषय अधिक प्रभावीपणे समजून घेऊ शकले.

उपक्रमादरम्यान काही आव्हानांचाही सामना करावा लागतो. जसे की विविध समुदायांतील सहभागींची शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी वेगवेगळी

असल्यामुळे प्रत्येक ठिकाणी संवादाची पद्धत बदलावी लागते. काही समुदायांमध्ये विषय समजावून सांगण्यासाठी अतिशय सोप्या आणि सहज भाषेचा वापर करणे आवश्यक होते. सहभागींच्या गरजा आणि समज लक्षात घेऊन उदाहरणे, अनुभव आणि दैनंदिन जीवनातील संदर्भ वापरत संवाद साधावा लागत होता. त्यामुळे संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी अधिक संयम, तयारी आणि लवचिकता आवश्यक असल्याचे जाणवले.

कोणत्यावेळी कोणती माहिती, उदाहरणे किंवा उपक्रम वापरल्यास संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचतो, हे अनुभवातून शिकायला मिळाले.

जनजागृती हा केवळ माहिती देण्याचा उपक्रम नसून समाजातील बदलाची सुरुवात आहे. योग्य वेळी योग्य माहिती मिळाल्यास अनेक मुलांचे भविष्य अधिक सक्षम आणि उज्ज्वल होऊ शकते. या उपक्रमातून मिळालेले अनुभव, आलेली आव्हाने आणि अनुभव पुढील कार्यासाठी प्रेरणादायी ठरतील.

समाजातील प्रत्येक कर्णबधिर बालकापर्यंत योग्य माहिती, उपचार आणि पुनर्वसनाच्या संधी पोहोचाव्यात, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

◆◆◆


**Your generosity can make a deaf child Speak**

Cochlea is registered under :
BPT 1950 Act.
Society Reg. Act.
PAN No. AAATC5056E

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | 'Cochlea Pune for Hearing and Speech' |
| Account No. | : | 60040230428 |
| Bank | : | Bank of Maharashtra |
| Branch | : | Shivajinagar, Pune. |
| IFSC Code | : | MAHB0000043 |

**All Donations are exempt under section 80G of the Income Tax Act.**

## संस्थेची केंद्र

**‘स्वरनाद’ कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
बिंदू माधव ठाकरे दवाखाना,
गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
कोथरूड, पुणे – ४११ ०३८.
संपर्क : रक्षा देशपांडे ९९२३२८९८४४
मृदुला देवळाणकर ८५५०९१२९७७

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी–चिंचवड लिंक रोड, पी.एम.टी.शेवटच्या बसस्टॉप समोर, चिंचवडगाव, पुणे ३३.
फोन : ९८२२६७१८४० / ९५२१६०४६००

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
मुंबई माता–बाल संगोपन केंद्र, वाडा रोड,
राजगुरुनगर – ४१० ५०५.
फोन : ९८५०७३८२७६

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव**
सावळेराम मार्केट, नारायणगाव,
डॉ.वाचासुंदर कान–नाक–घसा क्लिनिक, पुणे.
फोन : ९७६६२६२३२७; ७७९८४३४९८९

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
वाय.सी.एम. हॉस्पिटल,
(पिंपरी–चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी. फोन : ८०८७२२९९५४

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनवनगर,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
फोन : ९४०५९९८९८९

**‘पुसाळकर स्वरनाद’ माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
मॉंटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५,
उरवडे, पिरंगुट, ता. मुळशी,
पुणे – ४१२ ११५.
फोन : ९८२२०९४९४०; ९९२३२८९८४४

## नोडल केंद्र

**स्वरनाद पुनर्वसन केंद्र, गोवा**
अनघा, प्लॉट नंबर १५, पी.डी.ए. कॉलनी,
पर्वरी बार्देश, गोवा – ४०३ ५२१.
फोन : ९६२३७०१०२०


**स्वरनाद पुनर्वसन केंद्र, अहिल्यानगर**
एस.आर. वाघ यांचा बंगला, प्लॉट नं. ३५,
मधुबन कॉलनी, सपकाळ हॉस्पिटल मागे,
सहकारनगर, सावेडी, अहिल्यानगर.
फोन : ९४२०८०२४६३

**स्वरनाद पुनर्वसन केंद्र, दौंड**
शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट,
‘सी’ विंग, फ्लॅट नं.२,
फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे.
फोन : ७०४०६६८०७१/९२८४८५०७५०

**स्वरनाद पुनर्वसन केंद्र, मंचर**
प्रतिक आर्केड, १ ला मजला,
पुणे–नाशिक महामार्ग, लोखरे हॉस्पिटल जवळ,
पाटीलवाडा, मंचर. फोन : ९४२३०९३७८०








## सह्याद्रीपासून हिमालयापर्यंत : आवाजापलीकडचं स्वप्न



# अभिनंदन !

शैक्षणिक वर्षामध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे...



## १० वी

साई चांडक - ८१%
सिद्धांत गायकवाड - ७९%
समर्थ गुडेवार - ७४.६%
कल्याणी तरंगे - ७२.४%
आदित्य कोंडूभैरी - ७०%
ओम बाजरे - ५४%
यथार्थ अरगडे - ५3%
आदित्य सुर्यवंशी - ५२%
ओम मोरे - ५१%

## १२ वी

प्रथमेश कुंभार

## बी.टेक

ओम बाबर - ६५%
मृणाल बागल - ६०%



RNI No. : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015

Published and Posted on 10th JUNE, 2026
Posted at Model Colony PSO, Pune 411 016
on 10 of each month.

# नवीन वर्षाची पूर्वतयारी











**Address :**

**To,**